Google ला सर्च करा

गुरुमाऊली




गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

# इयत्ता – सातवी ( 6 ऑगस्ट ) विषय – मराठी

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

**शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट**

# दिवस सदतीस :






गतवर्षींच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

टेस्ट सोडवा

वाचा व समजून घ्या.

## ५. भांड्यांच्या दुनियेत

**सराव**

ताटल्या, वाडगे, पराती, रांजण, घडे अशी नित्योपयोगी भांडी बनवली.

**माधव** : अरे पण, आम्ही आजही मातीच्या माठातलं थंडगार पाणी पितो. छोट्या छोट्या मडक्यांत दही लावतो; पण काय रे, माणसानं फक्त मातीचीच भांडी बनवली का ?



**माहिती मिळवा.**

- उन्हाळ्यात माठाला ओले, सुती कापड का गुंडाळतात ?
- मातीचा माठ, रांजण जमिनीत का पुरतात ?

**सुरई** : नाही, तसं नाही. मातीच्या भांड्यांबरोबरच दगडी, लाकडी, चामड्याची भांडीही मानवानं तयार केली. तुम्ही चामडी बुधले, वाळलेल्या भोपळ्यापासून बनवलेले तुंबे कधी पाहिले आहेत का ?





**मंदा** : हो हो ! मी आंतरजालावर अशा भांड्यांची खूप चित्रं पाहिली आहेत. अजूनही आदिवासी भागातील लोक अशा वस्तूंचा उपयोग करतात, हेही वाचलं आहे.

**खलबत्ता** : मुलांनो, लाकडापासून बनवलेली, भिंतीलगत ठेवलेली ही काठवट पाहा. गव्हाचं, बाजरीचं, ज्वारीचं अशी पिठं मळण्यासाठी, भाकरी थापण्यासाठी तिचा उपयोग केला जायचा. आजही ग्रामीण भागांत काही घरांतून तिचा वापर होताना दिसतो.



(काठवटही न राहवून बोलू लागली.)

**काठवट** : अगं मंदा, तुला आठवतं का? तुझ्या आजीला आमचा नवा मित्र–मिक्सरची खूप भीती वाटायची. दाण्याचा कूट, मिरच्या, हळद, धने असं काहीबाही कुटण्यासाठी उखळ–मुसळ, दगडी खल किंवा हा खलबत्ता आजी वापरायची. पाटा–वरवंटा वापरायची.





आता तुम्हीच सांगा मुलांनो, आज उखळीमध्ये कोण पदार्थ कुटत बसतंय? लावला मिक्सर, की झालं काम. वेळ वाचतो अन् श्रमही वाचतात. पूर्वी पिठाच्या, मसाल्याच्या गिरण्या नव्हत्या. गृहिणी जात्यावर धान्याचं पीठ दळायच्या. धान्य पाखडायला सूप असायचं.

**मंदा** : हे सगळं खरं आहे; पण आज ही सर्व कामं करायला वेळ कोणाकडे आहे ?

**जाते** : मातीच्या व लाकडाच्या भांड्यांपाठोपाठ माणसानं तांबं, लोखंड या धातूंचा शोध लावला आणि मग भांडी बनवण्यासाठी त्यांचा वापर होऊ लागला; पण या धातूंच्या शोधामुळे भांडीसंस्कृती अधिक प्रगल्भ आणि विकसित होत गेली बरं का !

**अरुण** : म्हणजे फक्त भांडी बनवण्यासाठी या धातूंचा खूप उपयोग होऊ लागला, असंच तुला म्हणायचंय का? पण जातेभाऊ, आम्ही लोखंड आणि तांबं या धातूंच्या भांड्यांबरोबर चांदीचीदेखील भांडी पाहिली आहेत.

**जाते** : पलंग, खुर्ची, टेबल, कपाट, दारं–

## लसावि काढा.

# मसावि–लसावि

टेस्ट सोडवा

**जाणून घेऊया.**

**उदा.** 60 व 48 यांचा लसावि काढा.

प्रत्येक संख्येचे मूळ अवयव पाहू.

$60 = 2 \times 2 \times 3 \times 5$ $48 = 2 \times 2 \times 2 \times 2 \times 3$

वरील गुणाकारांत येणारी प्रत्येक मूळ संख्या पाहू.

2 ही संख्या जास्तीत जास्त 4 वेळा आली आहे. (48 च्या अवयवामध्ये)

3 ही संख्या जास्तीत जास्त 1 वेळा आली आहे. (60 च्या अवयवामध्ये)

5 ही संख्या जास्तीत जास्त 1 वेळा आली आहे. (60 च्या अवयवामध्ये)

∴ लसावि $= 2 \times 2 \times 2 \times 2 \times 3 \times 5 = 10 \times 24 = 240$

**उदा.** 18, 30 व 50 यांचा लसावि काढूया.

$18 = 2 \times 9 = 2 \times 3 \times 3$ | $30 = 2 \times 15 = 2 \times 3 \times 5$ | $50 = 2 \times 25 = 2 \times 5 \times 5$

वर दिलेल्या गुणाकारात 2, 3 व 5 या मूळ संख्या येतात.

2 ही संख्या जास्तीत जास्त ☐ वेळा, 3 ही संख्या जास्तीत जास्त ☐ वेळा व 5 ही संख्या जास्तीत जास्त ☐ वेळा आली आहे.

∴ लसावि $= 2 \times 3 \times 3 \times 5 \times 5 = 450$ ∴ 18, 30, 50 यांचा लसावि 450 आहे.

**उदा.** 16, 28 व 40 यांचा लसावि काढा.

उभी मांडणी

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 16 | 28 | 40 |
| 2 | 8 | 14 | 20 |
| 2 | 4 | 7 | 10 |
| | 2 | 7 | 5 |
| | | | |

- विभाज्यतेच्या कसोट्या वापरून सर्व संख्यांना भाग जाणाऱ्या संख्या शोधा व तिने दिलेल्या संख्यांना भागा. भागाकाराने मिळालेल्या संख्यांसाठी हीच क्रिया शक्य तेवढ्या वेळा करा.
- आता मिळालेल्या संख्यांपैकी कमीत कमी दोन संख्यांची विभाजक असलेली संख्या शोधून तिने ज्यांना भाग जातो त्या संख्यांना भागा. ज्या संख्येला भाग जात नाही, ती तशीच ठेवा. हीच क्रिया शक्य तेवढ्या वेळा करा.
- 1 शिवाय इतर कोणताही साधारण अवयव नसल्यास भागाकार थांबवा.
- डाव्या स्तंभातील संख्यांचा गुणाकार करा. त्याला सर्वांत खालच्या आडव्या ओळीतील संख्यांनी गुणा.

∴ लसावि $= 2 \times 2 \times 2 \times 2 \times 5 \times 7 = 560$

**उदा.** 18 व 30 यांचा लसावि व मसावि काढा. त्यांचा गुणाकार व दिलेल्या संख्यांचा गुणाकार यांची तुलना करा.

| | | |
|---|---|---|
| 2 | 18 | 30 |
| 3 | 9 | 15 |
| | 3 | 5 |
| | | |

मसावि $= 2 \times 3 = 6$

लसावि $= 2 \times 3 \times 3 \times 5 = 90$

मसावि × लसावि $= 6 \times 90 = 540$

दिलेल्या संख्यांचा गुणाकार $= 18 \times 30 = 540$

दिलेल्या संख्यांचा गुणाकार = मसावि × लसावि

टेस्ट सोडवा

## Find the LCF.

**Let's learn.**

**Example** Find the LCM of 60 and 48.

Let us find the prime factors of each number.

$60 = 2 \times 2 \times 3 \times 5$ $48 = 2 \times 2 \times 2 \times 2 \times 3$

Let us consider each prime number in these multiplications.

2 occurs a maximum of 4 times. (in the factors of 48)

3 occurs only once (in the factors of 60)

5 occurs only once (in the factors of 60)

$\therefore$ LCM $= 2 \times 2 \times 2 \times 2 \times 3 \times 5 = 10 \times 24 = 240$

**Example** Find the LCM of 18, 30, 50.

$18 = 2 \times 9$
$= 2 \times 3 \times 3$

$30 = 2 \times 15$
$= 2 \times 3 \times 5$

$50 = 2 \times 25$
$= 2 \times 5 \times 5$

2, 3, 5 are the prime numbers that occur in the multiplications above.

In the products above, the number 2 occurs a maximum of ☐ times, 3 occurs a maximum of ☐ times and 5 a maximum of ☐ times.

$\therefore$ LCM $= 2 \times 3 \times 3 \times 5 \times 5 = 450$ $\therefore$ The LCM of 18, 30, 50 is 450.

**Example** Find the LCM of 16, 28, 40.

Vertical arrangement

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 16 | 28 | 40 |
| 2 | 8 | 14 | 20 |
| 2 | 4 | 7 | 10 |
| | 2 | 7 | 5 |
| | | | |

- Use the tests of divisibility to find the prime number that divides all the numbers and then divide the given numbers. Repeat this process for the quotients as many times as possible.
- Now find the number that divides at least two of the numbers obtained and divide those numbers by the number you find. Do this as many times as possible. If a number cannot be divided, leave it as it is.
- Stop when the only common divisor you get is 1.
- Find the product of the numbers in the column on the left. Multiply this product by the numbers in the last row.

LCM $= 2 \times 2 \times 2 \times 2 \times 5 \times 7 = 560$

**Example** Find the LCM and HCF of 18 and 30. Compare the product of the LCM and HCF with the product of the given numbers.

| | | |
|---|---|---|
| 2 | 18 | 30 |
| 3 | 9 | 15 |
| | 3 | 5 |
| | | |

HCF $= 2 \times 3 = 6$

LCM $= 2 \times 3 \times 3 \times 5 = 90$

HCF $\times$ LCM $= 6 \times 90 = 540$

Product of the two given numbers $= 18 \times 30 = 540$

Product of the two given numbers = HCF $\times$ LCM

टेस्ट सोडवा

Read and understand. revision

(b)

| | | |
|---|---|---|
| run – ran | say – said | get – got |
| begin – began | reply – replied | bring – brought |
| sing – ............... | try – ............... | fight – ............... |
| meet – ............... | come – ............... | give – ............... |
| take – ............... | see – ............... | eat – ............... |

- Use any two of these pairs in a pair of sentences.

  Example : Run – ran : My dog runs very fast. Yesterday, it ran after a cat.

**Language Study**

## Types of Nouns

We have seen earlier that a noun is a word that is used to name a person, an animal, a place, a thing, an idea etc. The names given to particular persons, animals, places etc. are known as proper nouns and the rest are common nouns.

**Nouns**

| Common Nouns | Proper Nouns |
|---|---|
| girl boy city mountain | Akulka Malasha Sangeeta |
| table river book building | Anand London Mumbai |
| ruler table etc. | Sahyadri Narmada etc. |

- Write at least 5 common nouns and 5 proper nouns each. Note that proper nouns always begin with a capital letter.

  When you choose a name for your pet dog or cat, you are giving a proper noun to a common noun !

XJ9DEH

- Choose any 5 suitable common nouns and invent interesting names for them. Examples : a river – River Speedy, a magazine for children – Mitra (Friend), a building : Ace Towers.

**TOW**

Two minutes of Oral Work

Give as many examples of the following as possible within two minutes.

- Animals
- Birds
- Vegetables
- Body parts
- Musical instruments

(Use two minutes per word.)

वाचा समजून घ्या.

## ४. शिवपूर्वकालीन महाराष्ट्र

निघत. तेथे भजन, कीर्तन आणि सहभोजन (काला) या माध्यमातून समतेचा प्रसार होई.

टेस्ट सोडवा


संत नामदेव

**संत नामदेव :** हे वारकरी संप्रदायातील एक श्रेष्ठ संत होते. ते कुशल संघटक होते. ते उत्तम कीर्तनकारही होते. कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी सर्व जाती–जमातींमधील स्त्री– पुरुषांना एकत्र करून त्यांच्यात समतेची भावना जागवली. **'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।'** ही त्यांची प्रतिज्ञा होती. त्यांची अभंगरचना प्रसिद्ध आहे. अनेक संतांवर आणि सर्वसामान्य लोकांवर त्यांच्या शिकवणुकीचा प्रभाव पडला. ते आपल्या विचारांचा प्रसार करत पंजाबपर्यंत गेले होते. त्यांनी लिहिलेली पदे शिखांच्या 'गुरुग्रंथसाहिब' या ग्रंथात समाविष्ट आहेत. त्यांनी भागवत धर्माचा संदेश गावोगावी पोचवण्याचे कार्य केले. त्यांनी पंढरपूर येथे विठ्ठलाच्या महाद्वारासमोर संत चोखामेळा यांची समाधी बांधली. हे त्यांचे कार्य अविस्मरणीय आहे.

**संत ज्ञानेश्वर :** हे वारकरी संप्रदायातील एक विख्यात संत होत. त्यांनी 'भगवद्‌गीता' या संस्कृत ग्रंथाचा अर्थ मराठीत स्पष्ट करणारा 'भावार्थदीपिका' अर्थात 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ रचला. तसेच त्यांनी 'अमृतानुभव' या ग्रंथाची रचना केली. त्यांनी आपल्या ग्रंथांतून व अभंगांतून भक्तिमार्गाचे महत्त्व सांगितले. सामान्यांना आचारता येईल, असा आचारधर्म सांगितला. वारकरी संप्रदायाला धर्माची प्रतिष्ठा मिळवून दिली. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये जीवन जगावे लागलेले असूनही त्यांनी आपल्या मनाचे संतुलन ढळू दिले नाही आणि कटुताही बाळगली नाही. ज्ञानेश्वरीतील 'पसायदान' उदात्त संस्कार करणारे आहे. ज्ञानेश्वरांचे बंधू संत निवृत्तिनाथ व संत सोपानदेव आणि भगिनी मुक्ताबाई यांच्याही काव्यरचना प्रसिद्ध आहेत.


संत ज्ञानेश्वर

**संत एकनाथ :** हे महाराष्ट्राच्या भक्ती चळवळीतील एक महान संत होत. त्यांचे साहित्य विपुल व विविध प्रकारचे आहे. त्यात अभंग, गौळणी, भारुडे इत्यादींचा समावेश होतो. त्यांनी भागवत धर्माची मांडणी सोपी व सविस्तर केलेली आहे. भावार्थ रामायणात रामकथेच्या निमित्ताने लोकजीवनाचे चित्र रेखाटले आहे. त्यांनी भागवत या संस्कृत ग्रंथाच्या भक्तिविषयक भागाचा अर्थ मराठीत विशद केला. त्यांच्या अभंगात जिव्हाळा आहे. परमार्थप्राप्तीसाठी प्रपंच सोडण्याची आवश्यकता नाही, हे त्यांनी स्वत:च्या आचरणाने दाखवून दिले. ते खऱ्या अर्थाने लोकशिक्षक होते. आपली मराठी भाषा कोणत्याही भाषेपेक्षा कमी नाही असे ते मानत. **'संस्कृत वाणी देवे केली । तरी प्राकृत काय चोरापासुनि झाली ?'** असे त्यांनी संस्कृत पंडितांना ठणकावून विचारले. त्यांनी इतर धर्मांचा तिरस्कार करणारांवर कडक टीका केली आहे.


संत एकनाथ

**संत तुकाराम :** हे पुण्याजवळील देहू गावचे. त्यांची अभंगरचना प्रसन्न आणि प्रासादिक आहे. त्यांच्या अभंगांना श्रेष्ठ कवित्वाची उंची लाभली आहे. संत तुकारामांची 'गाथा' ही मराठी भाषेचा अमोल ठेवा आहे.


संत तुकाराम

# ३. भरती–ओहोटी

टेस्ट सोडवा

## वाचा व समजून घ्या.

सराव

लाटेच्या निर्मितीचे मुख्य कारण वारा हे आहे; पण काही वेळा सागरतळाशी होणारे भूकंप व ज्वालामुखींमुळे देखील लाटा निर्माण होतात. उथळ किनारी भागांत अशा लाटांची उंची प्रचंड असते. त्या अत्यंत विध्वंसक असतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी होते. अशा लाटांना त्सुनामी असे म्हणतात. २००४ साली सुमात्रा या इंडोनेशियातील बेटांजवळ झालेल्या भूकंपामुळे प्रचंड त्सुनामी लाटा निर्माण झाल्या होत्या. त्यांचा तडाखा भारताचा पूर्व किनारा व श्रीलंका या देशालाही बसला होता.

लाटांमुळे समुद्रात घुसलेल्या भू-भागांची झीज होते, तर उपसागरासारख्या सुरक्षित भागात वाळूचे संचयन होऊन पुळण निर्माण होते.

### *हे नेहमी लक्षात ठेवा.*

सागर सानिध्य असलेल्या प्रदेशात भूकंप झाल्यास, किनारी भागात त्सुनामीचा धोका निर्माण होतो. अशावेळी किनारी भागापासून दूर जाणे किंवा समुद्रसपाटीपासून उंचावर जाण्याची काळजी घ्यावी. त्यामुळे जीवित हानी टाळता येते.

### *मी आणखी कोठे ?*

- इयत्ता सहावी–सामान्य विज्ञान–ऊर्जासाधने.
- इयत्ता नववी–भूगोल–अंतर्गत हालचाली.
- इयत्ता सहावी–सामान्य विज्ञान–ऊर्जेची रूपे हा भाग.

### *माहीत आहे का तुम्हांला ?*

सागरकिनारी फिरताना किंवा पाण्यात खेळताना आपण भरती–ओहोटीच्या वेळांची पुरेशी काळजी घेतली पाहिजे, अन्यथा गंभीर दुर्घटना घडू शकतात. त्यासाठी आपल्याला भरती–ओहोटीच्या वेळा माहीत असणे गरजेचे आहे. या वेळा माहीत करून घेण्यासाठी तुम्हांला त्या त्या दिवसाची 'तिथी' माहीत असणे आवश्यक आहे. तिथीच्या पाऊणपट केले, की ती पूर्ण भरती असण्याची वेळ असते. उदा., तुम्ही सागरकिनारी चतुर्थी या तिथीच्या दिवशी आहात. चतुर्थी म्हणजे चौथा दिवस. त्याच्या पाऊणपट म्हणजे तीन. याचाच अर्थ त्या दिवशी दुपारी तीन वाजता व पहाटे तीन वाजता पूर्ण भरती असेल आणि त्याच्या साधारण सहा तास पुढे म्हणजेच रात्री नऊ व सकाळी नऊ वाजता पूर्ण ओहोटी असेल. स्थलकाळानुसार यात थोडाफार बदल होऊ शकतो. भरती–ओहोटीबरोबरच एखाद्या ठिकाणची सागरी किनाऱ्याची रचना, उतार, खडकाळ भाग, किनाऱ्याजवळील प्रवाह यांचा विचार करून व स्थानिकांशी चर्चा करून मगच समुद्रात खेळण्याचा आनंद घेतला पाहिजे.

अष्टमीच्या दिवशी येणाऱ्या भरती–ओहोटीच्या वेळा सांगा.



आकृती ३.१२ : पुळण

## 3. नैसर्गिक संसाधनांचे गुणधर्म


टेस्ट सोडवा

पाठ वाचा व समजून घ्या.

**जरा डोके चालवा.** अतिथंड प्रदेशात नदी, तलाव गोठल्यावरही जलचर जिवंत का राहू शकतात?

**करून पहा.**

दोन मोठे पेले घ्या. त्यात पाणी घाला. एका पेल्यातील पाण्यात 4–5 चमचे मीठ घालून ते पूर्णपणे विरघळून टाका. आता दुसऱ्या पेल्यातील पाण्यात एक बटाटा टाका. बटाटा पाण्यात बुडेल. बटाटा त्या पेल्यातून बाहेर काढून मिठाच्या पाण्यात टाका व निरीक्षण करा.




3.9 घनतेचा परिणाम

मीठ पाण्यात विरघळले असल्याने त्या पेल्यातील पाण्याची घनता वाढली व त्या वाढलेल्या घनतेमुळेच बटाटा पाण्यात तरंगू लागला.

विहीर/तलावाच्या पाण्यामध्ये पोहण्यापेक्षा समुद्रात पोहणे का सोपे जाते?

वरील कृतीमध्ये पेल्यातील पाण्यात मीठ टाकल्यावर ते विरघळते, म्हणजेच दिसेनासे होते. अशा प्रकारे नाहीसे होते म्हणजे नेमके काय होते?

पाण्यात विरघळताना मिठाचे कण पाण्यात पसरतात. हळूहळू ते आणखी लहान होत होत शेवटी इतके लहान होतात की ते दिसेनासे होतात, म्हणजेच ते पूर्णपणे पाण्यात मिसळतात. यालाच विरघळणे असे म्हणतात.

**द्राव्य** : जो पदार्थ विरघळतो – **मीठ**

**द्रावक** : ज्या पदार्थात द्राव्य विरघळते – **पाणी**

**द्रावण** : जेव्हा द्राव्य द्रावकात संपूर्णपणे मिसळते.

### गुणधर्मांनुसार पाण्याचा वापर

1. पाण्याच्या प्रवाहितेमुळे त्याचा जलवाहतुकीसाठी उपयोग होतो. उंचावरून खाली पडणाऱ्या पाण्याचा उपयोग करून जनित्राच्या साहाय्याने वीजनिर्मिती करतात.
2. पाणी हे उत्तम शीतक असून गाड्यांच्या रेडिएटर्समध्ये इंजिनचे तापमान नियंत्रित करण्यासाठी वापरले जाते.
3. पाण्यात अनेक प्रकारचे पदार्थ विरघळतात. पाणी हे वैश्विक द्रावक आहे. द्रावक म्हणून पाण्याचा उपयोग कारखान्यांमध्ये, प्रयोगशाळांमध्ये, अन्नपदार्थांमध्ये, शरीराच्या अंतर्गत होणाऱ्या पचन, उत्सर्जन इत्यादी अनेक प्रकारच्या जैविक प्रक्रियांमध्ये होतो.
4. अंघोळ करणे, कपडे धुणे, भांडी स्वच्छ करणे इत्यादींसाठी पाण्याचा उपयोग होतो.

**थोडे आठवा.**


1. मृदा म्हणजे काय? मृदा कशी तयार होते?
2. मृदेतील विविध घटक कोणते?

## 3. Properties of Natural Resources

Read and understand.

**Use your brain power!** In cold countries, how do aquatic animals remain alive even after the rivers or lakes freeze in winter?

**Try this.** Take two big glasses of water. Add 4-5 spoonfuls of salt to the water in one glass and dissolve it completely. Now place a potato in the water in the second glass. The potato will sink.




3.9 Effect of density

Take out the potato from that glass and put it in the salt water and observe. The density of water in that glass is greater due to the dissolved salt. The potato floats in that water because of the increased density.

Why is it easier to swim in the sea than in a well or a lake?

In the above activity the salt dissolves in the water in the glass, that is, it disappears. What happens when it disappears like this?

When the salt dissolves in water, its particles spread in water. Slowly they become smaller and smaller. Ultimately they become so small that they cannot be seen, that is, they mix completely with water. This is what is called dissolving.

**Solute :** the substance that dissolves - **Salt**

**Solvent :** the substance in which the solute dissolves - **Water**

**Solution :** what we get when the solute dissolves in the solvent.

### Uses of water according to its properties

1. Water is useful for water transport due to its fluidity. Water falling down from a height is used to generate electricity with the help of a generator.
2. Water is a good coolant and is used in motor vehicles to control the temperature of the engine.
3. Many substances are soluble in water. Water is a universal solvent. Water is used as a solvent in factories, laboratories, foodstuffs and in various types of biological processes occurring in the body such as digestion, excretion, etc.
4. Water is useful for cleaning purposes such as for bathing, washing clothes.

### Soil

**Let's recall.**

1. What is meant by soil? How is soil formed?
2. What are the ingredients of soil?

टेस्ट सोडवा

## रियाज़



### बताओ तो सही

हिंदी की विभिन्न बोलियों के नाम बताओ और उनसे संबंधित प्रदेशों के नाम लिखो :
जैसे-ब्रज, भोजपुरी, मारवाड़ी, दक्खिनी, गढ़वाली आदि ।

करना होगा। तुम्हारी और मेरी समस्या का मूल कारण दिनोंदिन बढ़ती आबादी, अशिक्षा और गरीबी है।

मेरे यहाँ लोग रोजगार की तलाश में आना कम कर दें । तुम गाँववालों को सहकारिता का महत्त्व समझाओ। सहकारिता पर आधारित छोटे-छोटे व्यवसाय तुम अपने यहाँ शुरू करवाओ ताकि कृषि आधारित अनेक लघु उद्योग, फलोत्पादन, औषधीय वनस्पतियों की खेती, पशुपालन जैसे अनेक व्यवसाय शुरू किए जा सकते हैं। अरे देहात भाई ! कितने भाग्यशाली हो कि तुम प्रदूषणमुक्त वातावरण में रहते हो । खुला-खुला परिसर, न धुआँ, न वाहनों की चिल्लपों, हरे-भरे पेड़ ये सब चीजें तुम्हारे पास हैं। रात में तारों भरा आसमान तो सबेरे उगते सूरज के दर्शन कितनी सहजता, सरलता से हो जाते हैं । हम तो इमारतों के जंगल में बदल गए हैं । खुला आसमान, बड़ा मैदान हमारे लिए कितने अनमोल एवं दुर्लभ हो गए हैं, ये तुम नहीं समझ सकते । तुम्हारे तहसील और क्षेत्र के लोगों को चाहिए कि वे अपने क्षेत्र का सर्वांगीण विकास करने के लिए अपने जनप्रतिनिधियों का सहयोग लें ।

तुम्हारे यहाँ जो बच्चे विद्यालय में पढ़ रहे हैं, यदि अभी से उन्हें सही दिशा, उचित मार्गदर्शन दिया जाए तो भविष्य में वे ही हम सबकी व्यथा कम कर सकते हैं । वे ही हमारे आशा स्थान हैं ।

मुझे पूरा विश्वास है कि उनपर अवश्य ध्यान दिया जाएगा ।

तुम्हारा अपना
शहर



### मैंने समझा

------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

### शब्द वाटिका



**नए शब्द**


**साझा करना** = बाँटना
**रौनक** = चमक-दमक
**व्यथित** = दुखी
**विख्यात** = बहुत प्रसिद्ध
**आबादी** = जनसंख्या
**चिल्लपों** = शोर

**मुहावरे**

**दुखड़ा रोना** = दुख सुनाना
**दिन दूनी-रात चौगुनी उन्नति** = तेज गति से विकास
**चार चाँद लगाना** = शोभा बढ़ाना

**कहावत**

**चिराग तले अँधेरा** = योग्य व्यक्ति के आसपास ही अयोग्यता



### वाचन जगत से

गाँव संबंधी सरकारी योजनाओं की जानकारी पढ़ो और मुख्य बातें सुनाओ ।



### अध्ययन कौशल

सुने हुए नए शब्दों की वर्णक्रमानुसार तालिका बनाकर संभाषण एवं लेखन में उनका प्रयोग करो ।

- विद्यार्थियों को महापुरुषों द्वारा लिखे पत्रों को पुस्तकालय/अंतरजाल के माध्यम से पढ़ने के लिए प्रेरित करें । संबंधियों द्वारा भेजे गए पत्रों का संकलन करने के लिए प्रेरित करें । अपने गाँव-तहसील, शहर के महत्त्वपूर्ण स्थलों का परिचय देने के लिए कहें ।

## माझा ऑनलाईन अभ्यास

### स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

### माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| सातवी मराठी | सातवी गणित | सेमी गणित | सातवी इंग्रजी | सातवी इतिहास |
|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| सातवी भूगोल | सातवी विज्ञान | सेमी विज्ञान | सातवी हिंदी |
|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

### दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

### इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

### MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

### गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here